पुण्यनगरी १५/०६/२०२४

# विनापरवाना हत्यारांसह चारचाकी वाहन जप्त

**नांदेड/प्रतिनिधी**

देगलूर तालुक्यातील खानापूर फाटा येथे एका चारचाकी वाहनात धारदार शस्त्र, लोखंडी तलवार, लोखंडी गजाळी, रॉड असे साहित्य पोलिसांना मिळून आले. दि. १२ जून रोजी देगलूर पोलिसांनी केलेल्या तपासणीत प्राणघातक शस्त्रे आढळली.

देगलूर तालुक्यातील खानापूर फाटा येथे देगलूर पोलीस गस्तीवर असताना त्यातील कर्मचाऱ्यांनी एम.एच.२६ बी.एक्स.५६९५ क्रमांकाच्या वाहनाची तपासणी केली असता या वाहनात धारदार शस्त्र, लोखंडी तलवार, लोखंडी गजाळी, रॉड अशी प्राणघातक शस्त्रे मिळून आली. हे चारचाकी वाहन नांदेड येथून तडखेलला गेले होते.

तडखेल येथून परत आल्यानंतर खानापूर फाटा येथे पोलिसांनी संशयावरुन या वाहनाची तपासणी केली. वाहनात धारदार शस्त्रे आढळून आली. वाहनाचा नंबर लक्षात येऊ नये यासाठी छोट्या आकाराची पाटी लावण्यात आली होती. या प्रकरणी योगेश वाकोडे (२३, रा.वडगाव ता.हिमायतनगर), कैलास बंडगर (३६, रा.बिजुर ता बिलोली), गणेश यशवंतकर (२८, रा. जुनागंज, इतवारा), मारोती वडजे (२५, रा.शेळगाव नृसिंह ता. देगलूर) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जमादार केंद्रे अधिक तपास करीत आहेत.

गोदावरी दि: १५/०६/२०२४

# इतवारा आणि बिलोली पोलिसांच्या कारवाईत २५ गोवंशाची सुटका; सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड-** गोवंशाची तस्करी करणाऱ्या सहा जणांना वेगवेगळ्या ठिकाणांहून अटक करून त्यांच्याकडून २५ गोवंश जप्त केले आहेत. इतवाराचे पोलीस उपनिरीक्षक विलास पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कारवाई केली.

माळटेकडी ब्रिजजवळ आतिफखान राहुल्लाखान (वय ३३ रा. मदिनानगर), गणेश सुधाकर जलताडे (वय २४ रा.पांगरी ता.अर्धापूर) या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्या वाहनातून पाच गोवंशांची सुटका करण्यात आली. या दोघाविरुद्ध इतवारा ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. याच भागात शालीमार फंक्शन हॉलसमोर कारवाई करून तीन गोवंशाची सुटका केली. अमोल प्रकाश पावडे रा. झरी जि.परभणी, शेख इर्शाद शेख बाबू रा.आझाद कॉलनी गडी मोहल्ला परभणी, सय्यदलाल सय्यद फकीर अहमद रा. किल्ला रोड नांदेड या तिघांना अटक केली. त्यानंतर देगलूर नाका भागात कारवाई करून आठ गोवश जप्त केले. मुस्तफा शेख शेख शफीउद्दीन याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून वाहन जप्त केले.

बिलोली शहरातील इदगाह भागात कारवाई करून नऊ गोवंशाची सुटका केली. बाबा खाजामिया याला अटक करण्यात आली आहे. पोलीस अंमलदार व्यंकट धोंगडे यांच्या फिर्यादीवरून बाबा खाजामियाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.